महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यात इंटरनेटच नसल्यामुळे ग्रामस्थांना ऑनलाईन उतारे मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याबाबत

(१) १४०७ (२२-१२-२०१४). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा तालुक्यात (जि.रत्नागिरी) काही ठिकाणी इंटरनेटच नसल्यामुळे ग्रामस्थंना ऑनलाईन उतारे मिळण्यास अनेक अडचणी निर्माण झाल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तलाठी कार्यालयात लाईन नाही, मोबाईल रेंज नाही यामुळे ऑनलाईन प्रक्रियेचा फज्जा उडालेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय त्यात का आढळून आले,

(४) तदनुसार पुढे शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६) :(१), (२), (३), (४) व (५) लांजा तालुक्यातील १२३ गावांपैकी ७८ गावांमध्ये नेटवर्क उपलब्ध नसल्यामुळे सदर तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी यांचे मुख्यालयी ब्रॉडबॅन्डने जोडणी करण्यात आली असून ग्रामस्थांना विहीत वेळेत गा.न.नं.७/१२ उतारे देण्यात येत आहेत.

लांजा तालुकयातील संबंधीत शेतक-यांना गा.न.नं. ७/१२ उतारे मिळण्यास येणाऱ्या अडचणींची वेळीच दाखल घेणे सुलभ होण्यासाठी सर्व ग्रामस्थांना टोल फ्री दुरध्वनी क्रमांक सुरु करण्यात आलेले आहेत.

तसेच रत्नागिरी जिल्ह्यासाठी स्टेट डेटा सेंटर, मुंबई येथे स्वतंत्र सर्व्हर तयार करण्यात आले असल्यामुळे सदरचे काम गतीमान झालेले आहे.

नागपूर जिल्ह्यातील तात्पुरती अस्थायी स्वरुपाची बनावट कनिष्ठ लिपीकांचे पदे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी भरल्याबाबत

(२) १५१९५ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील तात्पुरती अस्थायी स्वरुपाची १७ बनावट कनिष्ठ लिपीकांचे पदे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.सुभाषचंद्र भाकरे यांनी दिनांक ७ जुलै, १९९२ रोजी भरल्याबाबतची बाब माहितीचा अधिकार अंतर्गत उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा तत्वाची भरती प्रक्रिया राबवितांना शासकीय सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्ती स्वीकारणा-या कर्मचा-यांच्या जवळच्या नातेवाईकास पत्नी, मुलगा, मुलगी, सुन व नातु यांना शासकीय सेवेत अनुकंपा तत्वावर सामावुन घेण्याचा राज्य शासनाचा निर्णय असतांना सुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुकंपा विभागातील आस्थापना कनिष्ठ लिपिक श्री.आर.बी. बानाबाकोडे यांनी सन १९८५ पासूनचे अनेक पात्र प्रकरणे प्रलंबित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मागीतली असता असे निदर्शनास आले की, श्री.आर.वी.बानाबाकोडे हे सुध्दा श्री.अे.एस.देवते, कनिष्ठ लिपीक यांच्या जागेवर तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.सुभाषजी भाकरे यांच्या आदेशान्वये रुजू झाले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.बानाबाकोडे यांना सामान्य प्रशासन विभागाच्या कुठल्या शासन निर्णयानुसार नियुक्ती दिली आहे याबाबतची चौकशी करण्यात आली आहे,

(५) असल्यास, श्री.बानाबाकोडे हे कोणत्याही चुकीच्या मार्गाने लागले असल्यास त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०४-२०१६) :(१), (२) व (३) सामान्य प्रशासन विभागाच्या वायरलेस मेसेज दिनांक २६.०६.१९९२ अन्वये निवडणूकीच्या कामाकरिता कनिष्ठ लिपीकांच्या १७ अस्थायी पदांना मंजूरी प्राप्त झालेली असल्याने पूर्वी सेवेतून कमी करण्यात आलेल्या लिपीक-टंकेलेखकांना दिनांक ०७.०७.१९९२ रोजी फेरनियुक्ती देण्यात आलेली होती. यासंदर्भात माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात संबंधितांस माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय, दिनांक ०५ ऑक्टोबर, १९७९ अन्वये शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी, त्यांची मुले/बहीण आणि भाऊ जे त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून होते/आहेत त्यांचा कुटुंबात समावेश करण्यात आलेला आहे व शासन निर्णय, दिनांक २ मे २००१ अन्वये कुटुंबातील पात्र नातेवाईकांव्यतिरिक्त अन्य कोणीही अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र नसेल तर, कर्मचाऱ्याची सून यांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सन १९८५ पासूनची अनुकंपा नियुक्तीची प्रकरणे प्रलंबित नाहीत.

श्री.आर.बी.बानाबाकोडे हे अव्वल कारकून पदावर कार्यरत असून अनुकंपा बाबतची प्रकरणे कनिष्ठ लिपिकाकडे असल्याने त्यांचे स्तरावर प्रलंबित ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.आर.बी.बानाबाकोडे यांची जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश दिनांक ७ जुलै, १९९२ अन्वये तहसिल कार्यालय, कुही येथे श्री.अे.एस.देवते यांचे स्थानांतरणामुळे रिक्त झालेल्या पदावर पदस्थापना देण्यात आलेली होती.

(४) व (५) याबाबत चौकशी करण्यात आलेली असून सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.सीएनएस-१०८७/४९९/के.एन-१२/१६-अ, दि. ०४.०३.१९९१मधील तरतूदीनुसार जिल्हा निवड समितीने प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्यानंतर श्री.बानाबाकोडे यांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

श्री.आर.बी. बानाबाकोडे हे कोणत्याही चुकीच्या मार्गाने लागले नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नेरळ एस.टी. स्थानक परिसरात टाटा कंपनीमधील नेरळ टाटा कॅम्प कोल्हारे येथे एका विकासकाने ५० वर्षापूर्वीची झाडे जमीनदोस्त केल्याबाबत

(३) १९५३४ (१७-०९-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकास प्राधिकरणानुसार नेरळमध्ये (जि.रायगड) जमीन विकसित करण्यापासून झाडे तोडण्याबाबतचे अनेक निर्बध शासनाने घातले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निर्बध असतांनाही नेरळ एस.टी. स्थानक परिसरात टाटा कंपनीमधील नेरळ टाटा कॅम्प कोल्हारे येथे एका विकासकाने ५० वर्षापूर्वीची झाडे जमीनदोस्त केल्याचे नुकतचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यस, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार शासनाने दोषी व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०१-०४-२०१६) :(१) नेरळ माथेरान गिरीस्थान पर्यावरण संवेदनशील (इकोसेन्सेटीव्ह झोन) क्षेत्रामध्ये येत असून, सदर क्षेत्रामध्ये झोड तोडण्याबाबत निर्बध घातलेले आहेत.

(२) व (३) मौजे धामोते, ता.कर्जत येथील स.नं. ५५/१ मधील सुमारे ३० वर्षापूर्वीचे एक झाड तोडले असून, सदर झाड महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन) अधिनियमांतर्गत अनूसूचीतील नव्हते. सदर झाड विनापरवानगी तोडल्यामुळे संबंधितांकडून रु. १०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

वारजे माळवाडीतील वन विभागाने ३५ एकर भूखंड भटक्या-विमुक्तांसाठी गृहनिर्माण संस्थेस बांधणीसाठी देण्यात आलेला भुखंड खासगी बांधकाम व्यावसायिकाने बळकावल्याबाबत

(४) २२३२३ (०७-०९-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे माळवाडीतील वन विभागाने ३५ एकर भूखंड भटक्या-विमुक्तांसाठी गृहनिर्माण संस्थेस बांधणीसाठी देण्यात आला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे नावावर असलेल्या या जागे पैकी ५ एकर भूखंड एका खाजगी बांधकाम व्यावसायिकाने बळकावली असल्याचे माहे मे २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०२-०४-२०१६) :(१) मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल याचिका क्र.३६५९/१९९३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२७/०९/२००० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने याचिकाकर्ते रामनगर सहकारी गृहरचना संस्थेस मौजे वारजे येथील स.नं.३५ मधील १ हे ७६.५० आर क्षेत्र प्रदान करण्यात आले आहे.

(२) मौजे वारजे येथील स.नं. ३५ मधील ०१ हे . ७६.५० आर जागेबाबत रामनगर सहकारी गृहरचना संस्था मर्या पुणे या संस्थेने सिध्दार्थ प्रॉपर्टीज तर्फे भागीदार अभिजीत शेंड यांना विकसन करारनामा व कुलमुखत्यावर करुन दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर जिल्हा) तसेच भिवंडी (जि.ठाणे) आणि मालेगांव (जि.नाशिक) येथील विद्युत पुरवठ्याची समस्या तातडीने सोडविण्याबाबत

(५) २२८५२ (०६-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द गोवंडी (मुंबई पूर्व उपनगरा जिल्हा) तसेच (जि.ठाणे) मालेगांव (जि.नाशिक) या ठिकाणी आगामी पवित्र रमजान महिन्यात पुरेसा व पूर्ण दाबाने नागरी विद्युत पुरवठा करण्याबाबतची मागणी स्थानिक विभागातील विविध नागरी विकासाची संबंधित क्षेत्रातील स्थानिक जागरुक नागरीक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री (नगरविकास) तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पालकमंत्री, मा.राज्यमंत्री (नगरविकास) संबंधित महसूल विभागाचे विभागीय आयुक्त तसेच संबंधित जिल्हाधिकारी, संबंधित महापालिका आयुक्त तसेच ऊर्जा विभागचे संबंधित मुख्य अभियंता (नागरी) यांच्याकडे माहे मे, २०१५ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखरे पर्यंत काम पूर्ण करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०५-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) मालेगांव व भिवंडी शहरात पुरेसा व योग्य विद्युत दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी आय.पी.डी.एस. ही नवीन योजना प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

दौंड शहरातील (जि.पुणे) सत्ता प्रकार 'ब' च्या मिळकतीस सारानूतनीकरण अथवा मालकी हक्काने मिळणेबाबत

(६) २८३८६ (२३-१२-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड शहरातील (जि.पुणे) सत्ता प्रकार 'ब' च्या मिळकातीस सारा नूतनीकरण मिळणेबाबत अथवा या जमिनी कायमस्वरूपी मालकी हक्काने देणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा. महसूल मंत्र्यांना माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दौंड शहरातील सत्ता प्रकार 'ब' च्या मिळकतीस सारा नूतनीकरण मिळणेबाबत अथवा या जमिनी कायमस्वरूपी मालकी हक्काने देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-०४-२०१६) :(१) होय.
(२) व (३) राज्यात बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर भागातील शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यासंबंधीचे धोरण निश्चित करण्याकामी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील प्रलंबित पदोन्नत्यांबाबत

(७) २८५५५ (२१-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या पदोन्नती समितीची बैठक आयोजित करून अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील पदावरील प्रलंबित पदोन्नत्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा. महसूल मंत्री यांनी शासनाच्या मुख्य सचिवांना लेखी पत्राद्वारे निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात पदोन्नती देवून पदस्थापना देण्याबाबतचे आदेश दि. १६.३.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
II) उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना मंडळ क्र.२) यांना सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या आस्थापना मंडळ क. २ च्या कार्यवृत्तानुसार संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नती व पदस्थापना देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पावरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या वाहिनीमुळे बागायती पिकांचे नुकसान होवू नये यासाठी पर्यायी मार्गाचा विचार करणेबाबत

(८) २८५५९ (११-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातून जाणाऱ्या पावरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या ४०० केव्हीच्या वाहिनीमुळे बागायती पिकांचे नुकसान होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना केल्याची खात्री करून मगच वाहिनी उभारणेस परवानगी देण्यात यावी असे निर्देश दि २२ एप्रिल २०१५ रोजी शासनाने जिल्हा प्रशासनास दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहिनीबाबत पर्यायी मार्ग काढण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने सदर वाहिनीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०४-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनी मार्फत सदर पारेषण वाहिनीचे काम इलेक्ट्रीसिटी कायदा, २००३ व टेलीग्राफ कादा १८८५ नुसार बाधीत शेतकऱ्यांचे कमीतकमी नुकसान होईल अशा प्रकारे करण्यात येत आहे. या वाहिनीचे निफाड व दिडोंरी व्यतिरिक्त उभारणीचे काम पूर्ण झाले असल्याने वाहिनीचा मार्ग बदलणे आता शक्य नाही परंतु

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी/तहसिलदार कार्यालयाकडून निश्चित केलेल्या मुल्यांकनानुसार नुकसान भरपाई देण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दापोलीतील परवाना अधिकारी कार्यालय दैनंदीन सुरु ठेवण्याबाबत

(९) २९५४९ (२३-१२-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील हर्णे, पाजपंढरी, दाभोळ, आडे, बुरोंडी, केळशी, उटंबर, कोळधरें व पंचनदी या गावातील मच्छिमाराना मच्छिमार डिझेल, नौकांचा कौल काढणे इत्यादी परवाना मिळण्यासाठी असलेले दापोलीतील परवाना अधिकारी कार्यालय सदोदित बंद अवस्थेत असल्याची तक्रार सचिव,मत्स्य व्यावसाय विभाग, मंत्रालय व अधिक्षक अभियंता,मेरिटाईम बोर्ड यांच्याकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी लोकप्रतिनिधींनी तसेच मा.महसूल व मस्त्यव्यवसय मंत्री हे दापोली दौऱ्यावर असतांना उक्त गावातील मच्छिमारांनी सदर कार्यालय कायमस्वरुपी कार्यरत राहवे अशी मागणी केली आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, मा.महसूल व मत्स्य व्यवसाय मंत्र्यांनी दौऱ्यात उपस्थित असलेल्या मत्स्य व्यवसाय अधिकारी व मेरिटाईम बोर्डाचे अधिकारी यांना मच्छिमारांच्या मागणीच्या अनुषंगाने सदर कार्यालय दैनंदिन सुरु असावे अशा सूचना करुनही अद्यापही सदर कार्यालये बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालये कायमस्वरुपी सुरु रहावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :(१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) परवाना अधिकारी (दापोली) हे पद दि. ०२/०६/२०१५ पासून रिक्त होते. सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (परवाना अधिकारी) रत्नागिरी यांचेकडे दि. ०५/०३/२०१६ पासून सहाय्यक मस्त्यव्यवसाय विकास अधिकारी (परवाना अधिकारी), दाभोळ (दापोली) या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा जिल्ह्यातील महसूल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(१०) २९६७९ (२३-१२-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील नायब तहसिलदारांच्या १६, तहसिदारांच्या तीन तसेच महसूल विभागातील कारकून, लिपिक-टंकलेखन, तलाठी, वाहनचालक अशी सुमारे ११७ पदे रिक्त असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रिक्त पदांमुळे रिक्त पदांचा भार इतर कर्मचाऱ्यांवर पडत असल्याने कामकाज बंद होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत व बेरोजगारांना रोजगार मिळणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-०४-२०१६) :(१) बुलडाणा जिल्ह्यात महसूल विभागातील नायब तहसिलदार संवर्गात १९ पदे, तहसिलदार संवर्गात ३ पदे, लिपिक-टंकलेखक संवर्गात ३० पदे, अव्वल कारकून संवर्गात ८ पदे, तलाठी संवर्गात २७ पदे व वाहन चालकाची ३ पदे मिळून एकूण ९० पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) अमरावती विभागातील २६ नायब तहसिलदारांना तहसिलदर पदावर पदोन्नती देण्यात आली असून पदस्थापनेबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच अव्वल कारकुन/मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे. याशिवाय अव्वल कारकून, लिपीक-टंकलेखक, तलाठी व वाहन चालकाची रिक्त पदे सरळसेवा/पदोन्नतीने भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी तालुक्यातील जयगड येथील जिंदाल कंपनीने केलेल्या अवैध उत्खननाबाबत

(११) ३००११ (२३-१२-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी तालुक्यातील जयगड येथील जिंदाल कंपनीने केलेल्या अवैध उत्खननाबद्दल जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी कंपनीला ५३ कोटी रुपयांचा दंड केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिंदाल कंपनीने जिल्हाधिकारी यांनी केलेल्या दंडाबाबत विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडे केलेल्या अपिलाची सुनावणी होवून अप्पर आयुक्त यांनी केलेली दंडात्मक कारवाई माफ केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दंड माफ करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०३-२०१६) :(१) रत्नागिरी तालुक्यातील जयगड (कुणबीवाडी) येथील जिंदाल कंपनीने केलेल्या अवैध उत्खननाबाबत सुमारे रु.५३.२९ कोटी एवढा दंड आकारण्यात आला आहे, हे खरे आहे.

(२) होय, अप्पर आयुक्त कोकण विभाग यांनी दि.९.६.२०१५ च्या आदेशान्वये दंडात्मक आकारणी रद्द केली आहे.

(३) सदर कंपनीने प्रकल्पासाठी बंधारा बांधण्यासाठी केलेल्या उत्खननामधून निघालेले गौण खनिज प्रकल्पाच्या कामापैकी सपाटीकरण/भरावाच्या कामासाठी अंतिमरित्या वापरले नसल्याचे तसेच सदर गौण खनिज व्यावसायिक प्रयोजनासाठी वापरल्याचे नि:संशयरीत्या सिध्द होत नसल्याच्या कारणास्तव कंपनीकडून स्वामित्वधन घेण्याचे व दंडाची आकारणी रद्द करण्याचे आदेश अपर आयुक्त कोकण विभाग यांनी दिले आहेत.

रायगड जिल्ह्यातील वाळू उत्खनन व खनिज उत्खनन केलेल्या व्यतिविरुध्द करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत

(१२) ३०१६९ (२३-१२-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी वाळू व्यवसायीक व खाणमालकांनी वाळूचे उत्खनन केले, वाळूचा लिलाव घेतला, खनिज उत्खनन केले, असताना याबाबत महसूल खात्याने रॉयल्टीची रक्कम भरणा करण्यासाठी गेले वर्षभरापासून संबंधितांना नोटीसा पाठविल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती व्यवसायीकांनी पाठविलेल्या नोटीसानुसार रक्कम भरणा केली आहे,

(३) असल्यास, नोटीसा पाठवून देखील अद्याप किती व्यवसायीकांनी रॉयल्टीची रक्कम भरणा केलेली नाही,

(४) असल्यास, अद्याप किती रॉयल्टीची रक्कम वसूल होण्याची बाकि आहे,

(५) नोटीसा पाठवून रॉयल्टी रकमेची मागणी करुन ज्या व्यवसायीकांनी व वाळूचा लिलाव घेतलेल्या संबंधितांनी रक्कम भरणा केली नाही त्यांच्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०१-०४-२०१६) :(१), (२), (३), (४) व (५) रायगड जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन व वाहतूक प्रकरणी एकूण १४४ व्यावसायिकांना रु.४,२७,९८,९८३/- इतक्या रकमेच्या स्वामित्वधन व दंडनिय वसुलीबाबत नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्यापैकी १३० व्यावसायिकांकडून रु.२९,९९,४४१/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित १४ व्यावसायीकांनी दंडाची/स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा न केल्याने त्यांचेविरुध्द महाराष्ट्र

जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीअन्वये जमीन महसूलाची थकबाकी म्हणून सक्तीच्या उपायांनी वसूली करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

सटाणा (जि.नाशिक) शहरातील सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठा योजना ही कालबाह्या झाल्याबाबत

(१३) ३०५१६ (०१-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा (जि.नाशिक) शहरातील सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठा योजना ही कालबाह्या झाल्याने कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना होण्याबाबत मौजे ठेंगोडा गट क्र. ६६३ व ६७२ या शासकीय जमिनी साठवण तलावासाठी मिळण्याबाबत नगराध्यक्ष, सटाणा नगरपरिषद तसेच बागलाण लोकप्रतिनीधी यांनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान निवेदनाद्वारे मा.महसूल मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सटाणा शहरातील पाणीटंचाई लक्षात घेता शासनाकडून जमीन देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०४-०४-२०१६) :(१), (२), (३), (४) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्यामार्फत मौजे ठेंगोडा येथील गट क्रमांक ६६३ व ६७२ या शासकीय जमिनी साठवण तलावासाठी मिळण्याबाबतचा नगरपरिषद, सटाणा यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. महसूल व वन विभाग, अधिसूचना दिनांक ३१/१२/२०१५ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील नियम ६ मध्ये पोटनियम ३ नुसार शासकीय विभागांना जमिन मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहे. त्यानुसार वर नमुद प्रस्ताव उक्त अधिसूचनेतील तरतुदीनुसार तपासून पुढील आवश्यक त्या नियमोचित कार्यवाहीस्तव विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे दिनांक ११/३/२०१६ रोजी पतर पाठविण्यात आला आहे.

कराड (जि.सातारा) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जनावरांचा चाऱ्यांचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने शेतकऱ्यांवर जनावरे विकण्याची वेळ आल्याबाबत

(१४) ३०५७५ (२३-१२-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील कोळेवाडी-शिंदेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील खासगी पाळीव जनावरांसाठी खुल्या असलेल्या डोंगरातील पड क्षेत्रात काही लोकांनी कुळ कायद्याने मालकी हक्क दाखवून पाळीव जनावरांसाठी या क्षेत्रात बंदी घातली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मेंढपाळीसह शेतकऱ्यांच्या जनावरांचा चाऱ्यांचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने शेतकऱ्यांवर जनावरे विकण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुग्ध व्यवसायावर पुर्णत: अवलंबून असलेल्या या गावात चारा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (३०-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

कराड तालुक्यातील कोळेवाडी-शिंदेवाडी हद्दीतील डोंगरातील पड क्षेत्रात लोकांनी कुळ कायद्याने मालकी दाखवून जनावरांसाठी या क्षेत्रास बंदी घातल्याची कोणतीही तक्रार प्राप्त नसून चौकशी अंती अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) कृषि व पशुसंवर्धन विभागामार्फत केंद्र पुरस्कृत व जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत विविध वैरण विकास योजनांची अंमलबजावणी सातारा जिल्ह्यात करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कराड (जि.सातारा) तालुक्यातील घोणशी येथे वाळू उपशाबाबत प्रशासनाला खोटी माहिती देवून नियमांचा भंग केल्याबाबत

(१५) ३०५९९ (०८-०१-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील घोणशी येथील एका डेव्हलपर्सवर वाळू उपशाबाबत प्रशासनाला खोटी माहिती देवून नियमांचा भंग केल्याप्रकरणी पर्यावरण कायद्याचा भंग करणे इत्यादी बाबींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी कऱ्हाड तहसिलदारांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधित डेव्हलपर्सवर फौजदारी गुन्हे नोंदविण्याबाबत तहसिलदारानी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०४-०४-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) तहसिलदार कराड यांनी मौजे कोपर्डे घोणशी, ता.कराड येथील वाळूगटाचे लिलावधारक यांच्याविरुध्द वाळु लिलावातील अटी व शर्तीचा भंग करुन अनधिकृत वाळू उत्खनन केल्याबद्दल दिनांक १५/०९/२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आटपाडी तालुक्यातील (जि.सांगली) येथील वाळू चोरी करणाऱ्या वाहनांच्या मालकांवर कारवाई करण्याबाबत

(१६) ३०६३५ (२३-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी तालुक्यातील (जि.सांगली) येथील आटपाडी तहसिल कार्यालयाच्या पंटागणांत वाळू चोरी करणारी वाहने आवारात उभी केली जात असून तेथील वाळू चोरी करणा-या वाहन मालकांवर कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर वाळू चोरी करणा-या वाहनांच्या मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-०४-२०१६) :(१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीची वाहने आढळल्यास ती पकडून शासनाच्या ताब्यात घेण्यात येतात. कायद्यातील खनिजाबाबत वाहनमालकांवर दंडात्मक कारवाई करण्या येते. तसेच वाहन सोडण्यासंबंधीचे आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांकडून पारित झाल्यानंतर अशी वाहने सोडण्यात येतात.

कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील तहसिल कार्यालयाचा कारभार प्रभारी तहसिलदारांमार्फत चालत असल्याबाबत

(१७) ३०७०७ (०८-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील तहसिल कार्यालयाचा कारभार प्रभारी तहसिलदारांमार्फत चालत असल्याने मोठया प्रमाणत तहसिल कार्यालयातील कामे प्रलंबित राहत असल्याने तालुक्यातील नागरीक व विद्यार्थ्यांना त्याचा नाहक त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर तहसिल कार्यालयाचा कारभार पूर्ण क्षमतेने चालावा यासाठी तहसिलदाराचे पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अनसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०३-२०१६) :(१), (२) व (३) दिनांक ३०.०५.२०१५ पासुन तहसीलदार कुडाळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार निवासी नायब तहसीलदार कुडाळ यांचेकडे सोपविण्यात आला होता. दिनांक ०७.११.२०१५ पासुन तहसीलदार कुडाळ या पदावर नियमित नियुक्ती झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे कल्याण व भिवंडी परिसरातील-वाळू माफियांवार कारवाई करण्याबाबत

(१८) ३१०७४ (०८-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, कल्याण तसेच भिवंडी खाडी परिसरात महसूल विभागाने केलेल्या कारवाईत चाळू उपसा करणारी मोठी यंत्रणा प्रशासनाच्या हाती लागली, असताना वाळू माफिया यानी अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफियांना पकडण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०४-०३-२०१६) :(१) व (२) महसूल विभाग व पोलीस विभागामार्फत कल्याण व भिवंडी परिसरातील खाडी पात्रातील अवैध वाळू उपसाबाबत दिनांक २९/०९/२०१५ व ३०/०९/२०१५ रोजी केलेल्या कार्यवाहीत रेतीसाठी, बोटी वाहने व यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली असून, एकूण ९ गुन्हे दाखन करण्यात आली आहेत
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रधान आंतरराज्य प्रकल्प हा महाराष्ट्र व आंध्रप्रदेश (तेलंगणा) या दोन राज्याच्या संयुक्त प्रकल्प लवकर पूर्ण होण्याबाबत

(१९) ३२२३४ (२३-१२-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रधान आंतरराज्य प्रकल्प हा महाराष्ट्र व आंध्रप्रदेश (तेलंगणा) या दोन राज्याच्या संयुक्त प्रकल्प असून हा प्रकल्प लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रकल्पांतर्गत बाधित कुटूंबियांना भूखंड वाटप करण्याकरिता येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देणे, वन टाईम सेटलमेंट व कलम ३४ रद्द करणे या संदर्भात शासनाने निर्णय घेणार आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहेत,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०३-२०१६) :(१) व (२) खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेण्याबाबतचा शासन निर्णय दि.१२.५.२०१५ व शुध्दिपत्रक दि. ३०.९.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयानुसार थेट खरेदी करावयाच्या जमिनीच्या मोबदल्याचा दर ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे.

भूसंपादनाचा कायदा हा केंद्र शासनाचा कायदा असल्यामुळे कलम ३४ रद्द करणे ही केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब आहे.

लेंडी प्रधान आंतरराज्य प्रकल्पाबाबत वन टाईम सेटेलमेंट करणेची कार्यवाही जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई येथील कोळी समाजाच्या बोटींवर झालेले हल्ले

(२०) ३२२८९ (२३-१२-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसईच्या खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या कोळी समाजाच्या बोटींचे लाखो रुपयांचे नुकसान स्वर्ग रोहिणी, मुंबई नावाच्या बोटीने केले असल्याचे कोळी बांधवांनी १८ सप्टेंबर, २०१५ व त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पंन्न झाले त्या नुसार संबधित बोटीवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०४-०३-२०१६) :(१) व (२) खरे नाही. सदर घटनेबाबतचा विभागाकडे निवेदन किंवा तक्रार प्राप्त नाही. तथापि आटी येथी नौक अमरनाथ II IND-MH-०२-MH-II व प्रितीसंगम IND-MH-२-MH-१५४८ या नौकांना उत्तन येथील काही नौकांनी दि.४.१२.२०१५ रोजी महाराष्ट्राचे सागरी जलधीक्षेत्राबाहेर मागून धडक देऊन व नौकांची तोडफोड तसेच खलाशांना मारहाण केल्याचे संस्थेने पत्र दिले आहे.
(३) याबाबत यलोगेट पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या वॉटर टॅक परिसरात सुरु असलेल्या सेटलिंक टॅकच्या कामाबाबत

(२१) ३२४६९ (२३-१२-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या वॉटर टॅक परिसरात सुरु असलेल्या सेटलिंक टॅकच्या कामाचा कालावधी तीन महिन्यांचा असतांना दीड वर्षा पेक्षा जास्त कालावधी लोटून सुध्दा अद्यापही काम पूर्ण करण्यात आले नसून, सदर काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा ठपका शासकीय लेखा परीक्षण विभागाने ठेवला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम हे निकृष्ठ दर्जाचे असल्यामुळे कंत्राटदारावर १० टक्के दंड आकारण्यात यावा अशी शिफारास लेखा परीक्षण विभागाने महानिर्मितीकडे गेल्या आठ महिन्या आधी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे,वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाचे कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) सदरचे काम दिलेल्या वेळेत पूर्ण न झाल्यामुळे कामाच्या आदेशाचे अटी व शर्तीनुसार कामाच्या आदेशाच्या किंमतीच्या १० टक्के रक्कम कपात करण्यात यावी अशी शिफारस लेखा परिक्षण विभागाने केली होती.

(३) व (४) प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होण्यास विलंब होत असल्याने कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराच्या देय रक्कमेतून कामाच्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम राखून (Retention) ठेवण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कोतवाल, तलाठी आणि मंडळ अधिकारी यांची पदे वाढविण्याबात

(२२) ३२५७४ (०८-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोतवाल, तलाठी आणि मंडळ अधिकारी यांची पदे वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०८-०५-२०१६) :(१), (२) व (३) राज्यातील तलाठी साजांची पुनर्रचना समितीने सादर केलेल्या अहवालानुसार करण्यात येणा-या तलाठी साजांच्या पुनर्रचनेअंतर्गत कोतवाल, तलाठी व मंडळ अधिकारी यांची वाढीव पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावासंदर्भात वित्त विभागाशी विचार विनिमय करुन उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीराम शिक्षण संस्था पानीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील संस्थापक व सचिव यांनी केलेल्या बिगर शेती गटांमध्ये बनावट ७/१२ देवून अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याबाबत

(२३) ३२९९६ (२३-१२-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीराम शिक्षण संस्था पानीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील संस्थापक व सचिव यांनी केलेल्या बिगर शेती गटांमध्ये बोगस ७/१२ देवून अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी तेथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी सोलापूर तसेच शासनाकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये लेखी तक्रार केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-०४-२०१६) :(१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी उप विभागीय अधिकारी, माळशिरस उपविभाग यांच्याकडे चौकशीची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय महामार्ग क्रमाक-१७ प्रकल्पग्रस्त कृति समिती, ता.पनवेल, जि.रायगड यांनी भूसंपादन अधिकारी, यांना मागण्यांचे लेखी निवेदन दिल्याबाबत

(२४) ३३३३१ (२३-१२-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्रमाक-१७ प्रकल्पग्रस्त कृति समिती, (ता.पनवेल, जि.रायगड) यांनी भूसंपादन अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग-१७, तथा उपविभागीय पेण, (ता.पेण, जि.रायगड) यांना दिनांक १६ जून, २०१५ रोजीच्या सुमारास आपल्या मागण्यांचे एक लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या मागण्यांवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१७-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनामध्ये पुढीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत -

१.सीमांकनाची प्रक्रिया पूर्ण न करता टेबलावर बसून याद्या बनविल्या आहेत. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. तरी प्रत्यक्ष ठिकाणावर जाऊन सीमांकनाची प्रक्रिया पूर्ण करावी. ज्या व्यक्तींचे नुकसान होणार आहे त्यास त्याची माहिती व्हावी. त्यासाठी केलेल्या सर्वेक्षणाची प्रत शेतकऱ्यांना तात्काळ द्यावी.

२.बाधित तारा, कल्हे बांधनवाडी या गावांचा गावठाण विस्तार करुन पर्यायी जागा देण्यात यावी. हे प्रस्ताव गेल्या ३ वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयात पडून आहेत.

३.बाधित भूधारक घरमालक व व्यावसायिक यांना ज्या दिवशी ताबा घ्याल त्या दिवसाच्या बाजारभाराप्रमाणे मोबदला मिळावा.

४.(ROW) म्हणजे सध्या असलेल्या महामार्गाच्या मध्यापासून १५ मीटरच्या आतील सर्व बाधितांना मोबदला मिळालाच पाहिजे. आतापर्यंत ज्यांच्या जमिनी, घरे, हॉटेल रुंदीकरणात बाधित होऊन देखील काहीतरी कारण सांगून मोबदला दिला जात नाही अशी प्रकरणे तात्काळ निकालात काढून त्यांना त्यांच्या हिश्श्याचा मोबदला विनाविलंब देण्यात यावा.

(३) या मागण्यांबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे -

१.टेबलावर बसून याद्या बनविल्या आहेत अशी बाब नाही. राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ पनवेल - इंदापूर रस्ता रुंदीकरणामधील मौजे कर्नाळा (तारा) च्या सीमांकनाची प्रक्रिया उपअधीक्षक, भूमी अभिलेख, पनवेल व मोनार्क सर्वेक्षण व इंजिनिअर लि., पुणे यांच्या संयुक्त मोजणीद्वारे जागेवर जाऊन पर्ण केली आहेत. तसेच सर्वेक्षणाची माहिती दि.७.९.२०१५ रोजी तहसील कार्यालय, पनवेल येथे मौजे कर्नाळा (तारा) येथील बाधित शेतकरी प्रकल्पग्रस्त कृती समितीचे पदाधिकारी श्री.संतोष ठाकूर, श्री.रामभाऊ पाटील यांच्यासमक्ष संपूर्ण नकाशाचे संयुक्त मोजणीपत्राचे वाचन करुन देण्यात आली असून बाधित शेतकरी तसेच कृती समितीचे पदाधिकारी, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, कर्नाळा हे वेळोवेळी सर्वेक्षण झालेल्या क्षेत्राची माहिती घेत असतात व संबंधितांना माहिती दिली जाते. तसेच कोणत्याही बाधित शेतक-यांनी मागणी केल्यास त्यांना माहिती देण्यात येते/देण्यात येईल.

२.गावठाण विस्तारासंबंधीची बाब ही उपविभागीय अधिकारी, पनवेल यांच्या कार्यक्षेत्रात येत असून त्याबाबत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे गावठाण विस्थापनाबाबतचा प्रस्ताव सादर केला असल्याबाबत निवेदनात नमूद केलेले आहे.

३.बाधिन भूधारकांना मोबदला देताना ज्या वर्षामध्ये ३ A ची अधिसूचना प्रसिध्द झाली

आहे त्या वर्षातील ३ वर्षाचे खरेदी - विक्री व्यवहार व त्यांतील निम्मे व्यवहार घेऊन त्यांची सरासरी काढून व दुय्यम निबंधक, पनवेल यांच्याकडील खरेदी-विक्रीचे शीघ्रसिध्दगणकाचे दर काढून त्यांपैकी जास्तीचे दर असतील त्याप्रमाणे मोबदला देण्यात आला आहे.

४.महामार्गाच्या १५ मीटरच्या आतील व शासकीय जागांमधील सर्व बाधितांच्या घरांचे पंचनामे करण्यात आले असून त्याप्रमाणे सदर घरे दुरुस्ती संयुक्त मोजणीमध्ये घेण्याबाबतचा प्रस्ताव उपअधीक्षक, भूमी अभिलेख, पनवेल यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. दुरुस्ती संयुकत मोजणी पत्रक प्राप्त झाल्यावर सार्वजनिक बांधकाम, उपविभाग पनवेल यांच्याकडे मूल्यांकनाचा प्रस्ताव पाठवून व सदर अहवाल प्राप्त झाल्यावर त्याबाबतचा ३ - A व ३ - D अहवाल अधिसूचनेसाठी पाठवून सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्यावर मोबदला देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) येथील गावांच्या शेत जमिनीमधून रिलायन्स गॅस पाईपलाईन जात असल्याने तशा प्रकारच्या नोटीसा भूसंपादन विभागाकडून शेतकऱ्यांना दिल्याबाबत

(२५) ३३५५७ (२३-१२-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) निकोप, कडाव, मार्केवाडी, वडवली, भातगाव, वावळोली, बेंडसे, कोषाणे, सावरगाव आदि गावांच्या शेत जमिनीमधून रिलायन्स गॅस पाईपलाईन जात असल्याने तशा प्रकारच्या नोटीसा भूसंपादन विभागाकडून संबंधित शेतकऱ्यांना माहे जुलै, २०१५ मध्ये देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील शेतकऱ्यांनी आपल्या शेत जमिनीतून पाईप लाईन टाकण्यास लेखी स्वरुपाची हरकती घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक, लोकप्रतिनिधीसह अनेक सामाजिक कार्यकतर्यांनीही याला विरोध केला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०४-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सुर्या प्रकल्प, डहाणू तथा सक्षम प्राधिकारी, रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. घोडबंदर मार्ग, ठाणे (पश्चिम) या कार्यालयाकडून संबंधीत शेतकऱ्यांना पेट्रोलियम व मिनरल्स पाईपलाईन्स

(जमिनीच्या वापराच्या हक्कांच्या संपादनाचा) अधिनियम, १९६२ च्या कलम ३(१) अनुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या नोटिसा दि. ३.८.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय, पेट्रोलियम व मिनरल्स पाईपलाईन्य (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम, १९६२ च्या कलम ३(१) च्या अधिसूचनेस संबंधित शेतकऱ्यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ५(१) अनुसार त्यांच्या हरकती/सूचना सादर केल्या आहेत.

(३) होय.

(४), (५) व (६) प्रस्तुत प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांकडून व इतर हितसंबंधितांकडून प्राप्त झालेल्या सूचना/हरकतीची सुनावणी तहसीलदार, कर्जत यांच्या कार्यालयाच्या सभागृहात उपरोक्त अधिनियमाच्या कलम ५(२) अनुसार घेण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाकडे सुरु आहे.

शासकीय जमिनीवर राहत असलेल्या झोपडपट्टी धारकांना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत

(२६) ३३९४१ (२३-१२-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय जमिनीवर राहत असलेल्या झोपडपट्टी धारकांना शासनाच्या २ एप्रिल, २००२ च्या शासन निर्णयानुसार मालकी हक्काचे उतारे देण्याची प्रक्रिया सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागांचे लेआऊट तयार करण्यासाठी तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी करु असे प्रतिज्ञापत्र श्रीमती हेमलता बडे यांनी औरंगाबाद खंडपीठात दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत अदयापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, शासन निर्णयानुसार तहसिलदारांनी समित्या स्थापन केल्या असून त्यांना मार्गदर्शन मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे व कधी राबविण्यात येणार आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०४-०४-२०१६) :(१) व (२) शासन निर्णय क्र.एलईएन-१०/२००१/प्र.क्र.२२५/ज-१, दिनांक ४.४.२००२ अन्वये दि. १.१.१९९५ पर्यंत राज्यातील (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून) शासकीय जमिनीवरील झोपडपट्टीधारकाने निवासी वापरासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतचे धोरण विहित करण्यात आले अहे.

सदर शासन निर्णयामध्ये ग्रामीण भागात शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याकरिता त्या जमिनीचा योजना आराखडा (ले-आऊट) तयार करण्याकरिता संबंधित तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची तरतूद आहे.

(३) दिनांक ४.४.२००२ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या कार्यालयातील तहसिलदार, श्रीमती हेमलता बडे यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, येथील जनहित याचिका क्र. ३९/२०१४ या जनहित याचिकेमध्ये प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

(४), (५) व (६) शासन निर्णय दि. ४.४.२००२ मधील तरतूदीनुसार तहसिलदार यांनी समित्या स्थापन केल्या असून पात्र झोपडपट्टी अतिक्रमणे नियमाकूल करण्याकामी पुढील कार्यवाही करण्यात येते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथून बदली झालेल्या तलाठयाने न्यायालयाची स्थगिती असताना पाच जणांच्या जमिनीवर बोजा चढविल्याबाबत

(२७) ३४४८६ (०८-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथून बदली झालेल्या तलाठयाने न्यायालयाची स्थगिती असताना पाच जणांच्या जमिनीवर बोजा चढविला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर तलाठयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०१-०४-२०१६) :(१) असे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील माणगाव खोऱ्यातील आकारीपड जमिनी शेतकऱ्यांना ताब्यात देण्याचा महत्त्वपूर्ण राज्य शासनाने घेतलेला निर्णय

(२८) ३४६२५ (०८-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील माणगाव खोऱ्यातील आकारीपड जमिनी शेतकऱ्यांना ताब्यात देण्याचा महत्त्वपूर्ण राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयामुळे जिल्हयातील माणगांव खोऱ्यातील शेतकरी कुटुंबांना त्यांच्या जमिनी परत दिल्या जाणार आहेत काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींवर केव्हापर्यंत निर्णय घेण्यात येणार आहे वा घेण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :(१), (२), (३) व (४) सावंतवाडी, कुडाळ आणि कणकवली तालुक्यातील "आकारपड" जमिनी वाहिवाटदारांना वाटप करण्याबाबतचा शासन निर्णय दि २९/९/१९८७ रोजी घेण्यात आला असून त्याबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्या धर्तीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील माणगाव खोऱ्यातील "कवळकाड" यो संज्ञेखाली येणारी आकारीपड जमीन एकूण ५१८ वहिवाटदारांना वाटप करण्याबाबतचा शासन निर्णय दि.१९/०१/२००९ अन्वये घेण्यात आला आहे. या प्रकरणात मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका ६४१९/२०११ तसेच रिट याचिका क्रमांक ९५/२०१५ मधील मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रकरणी प्रत्यक्ष वाहिवाटीची चौकशी करुन व पुरावे पाहून माणगाव खोऱ्यातील शेतकऱ्यांना आकारपीड जमीन वाटप करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे देवलापार (जि.नागपूर) येथील नायब तहसिलदार कार्यालयात नायब तहसिलदार नियुक्ती करण्याबाबत

(२९) ३४६३३ (०८-०१-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देवलापार (जि.नागपूर) येथील नायब तहसिलदार कार्यालयात जनतेच्या सोयीसाठी नियमित नायब तहसिलदार यांची नियुक्त करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी शासनाने अद्यापपर्यंत कायम स्वरुपी नायब तहसिलदार न देण्याची कारणे काय आहेत
(३) असल्यास, देवलापारात आदिवासी क्षेत्र असल्यामुळे येथे नायब तहसिलदार नसल्यामुळे शासनाच्या अनेक सुविधा जनतेला मिळत नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी कायमस्वरुपी नायब तहसिलदार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-०४-२०१६) :(१), (२), (३) व (४) मौजे देवलापार, ता.रामटेक, जि.नागपूर येथे एक स्वतंत्र नायब तहसिलदार यांचे कायमस्वरूपी कार्यालय सुरु करुन उपलब्ध असलेल्या नायब तहसिलदारांपैकी एका अधिकाऱ्याची तेथे नेमणूक करण्याबाबत शासनाने दि. ०७.१.२०१३ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांना निर्देश दिले होते. त्यानुसार

दि.२७.४.२०१३ पासून देवलापार येथे नायब तहसिलदार यांचे कायमस्वरुपी कार्यालय सुरु करुन अतिरिक्त कार्यभार देऊन कार्यालयाचे कामकाज करण्यात येत आहे. सदर नायब तहसिलदारांना आठवड्यातून ३ दिवस देवलापार मुख्यालयी पूर्ण वेळ हजर राहून कामकाज पार पाडण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांनी निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील एकत्र कुटूंबांच्या मिळकतीसंबंधी

(३०) ३५१०५ (०८-०१-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील एकत्र कुटूंबांच्या मिळकतीसंबंधी जेव्हा तोंडी वाटप केले जाते आणि मिळकतीची प्रत्यक्ष विभागणी केली जात नाही परंतू नंतर प्रत्येक मोजमापे होऊन लेख तयार केली तरी ते तोंडी वाटप होत नाही तर तो लेख रजिस्टर करावा लागतो अन्यथा लेख ग्राह्य धरला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) स्थावर मालमत्तेच्या वाटपाचे अभिलेख तालुक्यातील वाचेरी गावातील तलाठी कार्यालयाकडे व तहसिलदार, कणकवली यांच्याकडे निदवेदनाद्वारे माहे २०१४ रोजी माहितीचा अधिकार कायदा, २००५ कलम ३ अन्वये रजिस्टर नोंद नसल्याचे श्री. विजयकुमार परशुराम राणे या वारसदारास उपलब्ध नसल्याच दि. १२/९/२०१४ रोजी तलाठी व तहसिलदारंनी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर मिळकतीबाबतची नोंद असलेली माहिती महसूल विभागाच्या कोणत्या सक्षम अधिकाऱ्याकडे मिळू शकेल,

(४) असल्यास, याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी दि. २/०९/२०१५ रोजी मा. महसूल मंत्री, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री यांना निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) अर्जदार श्री.विजयकुमार राणे यांनी केलेल्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जाच्या अनुषंगाने तलाठी, वाघेरी यांनी दि. १/९/२०१४ च्या पत्रान्वये माहिती दिली आहे. अर्जदार यांनी मागणी केलेल्या तोंडी वाटपाची प्रत तलाठी कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्याने अर्जदारास देता आली नाही.

(४) व (५) लोकप्रतिनिधी यांनी अनुक्रमे मा. मंत्री (महसूल) व मा. पालकमंत्री सिंधुदुर्ग यांना दि. ४/९/२०१५ व दि. १६/९/२०१५ रोजी दिलेली निवेदने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दि. १६/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती संबंधितांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

घोटी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील देशी व डांगी जनावरांच्या प्रदर्शनाला अधिक चालना मिळण्यासाठी निधी मिळण्याबाबत

(३१) ३५७४७ (१४-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे देशी व डांगी जनावरांच्या संवर्धनाला चालना मिळावी, पशु पालकांना जातिवंत डांगी जनावरांबद्दल अधिकची माहिती मिळावी या उद्देशाने भरविण्यात येणाऱ्या देशी व डांगी जानारावारांच्या प्रदर्शनाला अधिक चालना मिळण्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०५ एप्रिल, २०१५ रोजी मा.वित्तमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ सन २०१५-१६ मध्ये जिल्हा परिषद, नाशिक सेस फंडामधून सदरील प्रदर्शनासाठी प्रति वर्ष रु. २.०० लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

तसेच, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये देखील सदर प्रदर्शनासाठी रु.३.०० लक्ष निधीची मागणी करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उरण (जि.रायगड) येथील मोरा कोळीवाडा मच्छिमार सहकारी सोसायटी बरखास्त केल्याबाबत

(३२) ३६४५९ (०८-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील मोरा कोळीवाडा मच्छिमार सहकारी सोसायटी शासनाने कोणतेही कारण न देता, माहे जुन २०१५ रोजी बरखास्त केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मच्छिमार संस्था कोणतेही कारण न देता शासनाने परस्पर बरखास्त करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणतेही करण न देता मच्छिमार संस्था बरखास्त करणाऱ्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६) :(१) हे खरे नाही. सदर संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये कार्यवाही करुन प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) संस्थेच्या कामकाजात गंभीर दोष/त्रुटी आढळून आल्याने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. संस्थेने सादर केलेल्या मुद्देनिहाय खुलासा समाधानकारक नसल्याने प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर ते मुंबई दुग्ध भुकटी वाहतूक ठेका संदर्भात काढलेली निवदा

(३३) ३६४९० (०८-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे जुलै, २०१५ मध्ये प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली उदगीर ते मुंबई दुग्ध भुकटी वाहतूक ठेक्यासंदर्भात निविदा काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उदगीर ते मुंबई एका वेळेचे ६०० कि.मी. अंतरासाठी अंदाजे १५० लिटर डिजेल खर्च रु.७,५००/- इतका येत असताना रु.३०,१५०/- इतक्या खर्चाची निविदा मंजूर करण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्याकरिता मा.आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, यांच्याशी दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी पत्रव्यवहार करूनही अध्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२८-०३-२०१६) :(१) होय, तथापि सदर निविदा प्रक्रिया माहे जुलै, २०१५ ऐवजी माहे जून, २०१५ मध्ये पार पडली आहे.
(२) हे खरे नाही.
उदगीर ते मुंबई हे परतीचे अंतर एकूण ११४८ कि.मी. असून ९ ते १० मे.टन दूध भुकटीसाठी रु. ३४५०/- प्रती मे.टन ठेका मंजूर करण्यात आला आहे.
(३) या प्रकरणी सखोल चौकशी करण्याचे आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांना निदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

५०० चौ. फुटांच्या आतील क्षेत्रफळ असलेल्या निवासी गाळयांचा मुद्रांक शुल्क माफ करीत असल्याची घोषणा केल्याबाबत

(३४) ३८२२० (०८-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र विधिमंडळ पावसाळी अधिवेशन २०१५ च्या सुरुवातीला मा.मुख्यमंत्री, महोदयांनी ५०० चौ. फुटांच्या आतील क्षेत्रफळ असलेल्या निवासी गाळयांचा मुद्रांक शुल्क माफ करीत असल्याची घोषणा केली मात्र याबाबत परिपत्रक काडण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक मध्यवर्गीयांना दिलासा देण्यासाठी शासनामार्फत या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :(१) मुद्रांक शुल्काबाबत घोषणा करण्यात आलेली नाही. सबब परिपत्रक निर्गमित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सरकारी वीज कंपन्यांनी एल.आय.सी. आठ टक्के व्याज दराने ३५ हजार कोटी रुपयांचे कर्ज देण्यास तयार असतानाही ज्यादा व्याजदराने कर्ज घेतल्याबाबत

(३५) ३८२४१ (०८-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सरकारी वीज कंपन्यांनी एल.आय.सी. आठ टक्के व्याज दराने ३५ हजार कोटी रुपयांचे कर्ज देण्यास तयार असतानाही व्याजापोटी दिले जाणारे १८०० कोटी रुपये वाचणार असतानाही ४५ हजार कोटी रुपयांचे कर्ज माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ज्यादा व्याज दराने घेतले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा व्यवहार कोणाच्या सल्ल्याने, मंजूर करण्यात आला आहे
(३) असल्यास, या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या संबंधिताविरोधात शासनाने कोणती दंडात्मक स्वरुपाची कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०४-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भीड-परळी रेल्वे मार्गासाठी तातडीने भूसंपादन पूर्ण होत नसलबाबत

(३६) ३८७९४ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड-परळी रेल्वे मार्गासाठी करण्यात येत असलेल्या भूसंपादन आजतागायत पूर्ण झाले नसल्याची बाब माहे जूलै, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठीच्या भूसंपादनाची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी भूसंपादीत प्रक्रीया तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर प्रक्रीया किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) बीड-परळी रेल्वे मार्गाच्या भूसंपदानखालील एकूण १५३८.५७ हे.आर. क्षेत्रापैकी ११६४.५७ हे आर. क्षेत्राच्या प्रारुप निवाड्यास मंजुरी प्राप्त झाली असून २९ हेक्टर २ आर क्षेत्राचे संपादन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे पूर्ण करण्यात येणार आहे. उर्वरित ३४८ हे ९८ आर क्षेत्राकरीता भुसंपादन कायदा २०१३ प्रमाणे कलम ११ नूसार अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि सदर प्रकरणी थेट खरेदी पध्दतीने जमीन घेण्यासाठी रेल्वे विभागाने संमती नंतरच्या काळात दिलेली असल्यामुळे शा.नि.दि. १२.५.२०१५ व दि. ३०.९.२०१५ मधील तरतूदीप्रमाणे कार्यवाही सद्या चालू आहे.
(३), (४) व (५) शासनाने सदर प्रकल्पाच्या कामाचे सनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर/बीड यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक बैठक २०१५/प्र.क्र.६९/अ-१ दिनांक १६/१०/२०१५ च्या अन्वये समिती गठीत केलेली आहे. त्यानुसार सदर समितीने या प्रकल्पाच्या भूसंपादनाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करुन व कालबध्द कार्यक्रम आखून त्वरेने पूर्ण करणे आवश्यक आहे.

सद्या एकूण २७ गावांमध्ये थेट खरेदी पध्दतीने जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असून त्याअंतर्गत संबंधित १४ गावांमधील जमीन मालकांनी लेखी संमती पत्र उप जिल्हाधिकारी/तहसिलदार त्यांच्याकडे सादर केलेले आहे. उर्वरित गावांमध्ये संमतीपत्र मिळविण्याचे काम सुरु असून सदर प्रकल्पासाठी जमीनीचा ताबा रेल्वे विभागाकडे देण्याबाबतचे नियोजन जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून करण्यात आले आहे.

भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील रोहा येथील सिलिंग मध्ये मिळालेल्या जागेची विक्री केल्याबाबत

(३७) ३९१६८ (११-०१-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील रोहा येथील त.सा.क्र. १६ मधील ग.क्र. १३६८ व १३३२ ची जागा १९६० साली श्री.रामा गणेश उरकुडे व सौ.देवलाबाई दादू गजभिये यांना मिळाली होती. सदर जागेची विक्री केलीली जमीन ग्रामपंचायतीने निदर्शनास आणल्यानंतर सदर जमिन सरकार जमा करण्यात आली असून या जमिनीचा ताबा अदयापपर्यंत घेण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (११-०४-२०१६) :(१), (२) व (३) १९६० साली श्री.रामा गणेश उरकुडे व सौ. देवलाबाई दादू गजभिये यांना प्रदान करण्यात आलेल्या मौजा रोहा ता.मोहाडी, जि.भंडारा येथील गट क्र. १३६८ व १३३२ या जागेची संबंधितांनी विक्री केल्याने शर्तभंग झाला असल्यामुळे सदर जागा सरकार जमा करण्यात आली असून संबंधित जमिनीच्या गाव नमूना नं. ७/१२ वर "सरकार" अशी नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे सदर प्रकरणात संबंधितांना प्रस्तुत जागेचा कब्जा सोडण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. तथापि, संबंधित व्यक्तींनी सदर जागेचा कब्जा न सोडता सदर जागेवर पिकांची लागवड केल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार पीक जप्त करण्याचे निदेश देण्यात आले होते. तथापि, त्या दरम्यान सदर जमिन सरकार जमा करण्याबाबतच्या आदेशाविरुध्द संबंधितांनी अप्पर जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे दाखल केलेल्या अपील प्रकरणामध्ये दिनांक १६/१२/२०१५ च्या आदेशाद्वारे अपिलार्थी यांना संधी देवून प्रकरण निकाली काढण्याबाबत उप विभागीय अधिकारी, तुमसर यांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, तुमसर यांच्याकडून सदर प्रकरणी सुनावणी घेवून प्रकरणी निकाली काढण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गंगाखेड (जि.परभणी) येथील तहसीलदार यांना तात्काळ निलंबीत करण्याबाबत

(३८) ३९५७४ (१३-०१-२०१६). श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील तहसिलदार यांचे विरुध्द स्थानीक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीवर विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगाखेड (परभणी) येथील तहसिलदार यांचेवर दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी विधान परिषद सभागृहामध्ये चर्चेच्या वेळी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत मा.मंत्री, महोदयांनी आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गंगाखेड (जि.परभणी) येथील तहसिलदार यांच्यावर दिलेल्या आश्वासनानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०३-२०१६) :(१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) तत्कालीन तहसीलदार, गंगाखेड (जिल्हा परभणी) यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारीबाबत प्राथमिक चौकशीअंती विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक १.१२.२०१५ च्या ज्ञापनान्वये त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करुन त्यांना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे दिनांक २७.०१.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या २० जुलै २०१५ च्या शासन निर्णयान्वये १०० हेक्टरपर्यंतचे सर्व तलाव ग्रामपंचायतीला देण्याबाबत निर्णय झाल्यामुळे मच्छिमारांच्या हजारो सहकारी संस्था बंद होणार असल्याबाबत

(३९) ३९६०३ (१३-०१-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १०० हेक्टर जलक्षेत्र असलेले पाझर तलाव ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्याच्या निर्णयामुळे राज्यातील हजारो मच्छिमार संस्था बंद होणार असल्याने मच्छिमार मोठया प्रमाणात बेरोजगार होणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात ३५ जिल्हा मत्स्यव्यवसाय संघ असून सुमारे ३६०० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आहेत त्यांची सभासद संख्या ही साडेतीन लाखाच्या जवळपास असून या माध्यमातून जवळपास ५० लाख युवक मच्छिमारांना रोजगार मिळतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांप्रमाणे मत्स्यव्यवसायीकांवर आत्महत्या करण्याची पाळी येवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२४-०२-२०१६) :(१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे अशत: खरे आहे.

राज्यात सद्य:स्थितीरत सुमारे २९३१ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था असून ३४ जिल्हा संघ, २ विभागीय संघ व १ शिखर संघ पंजीकृत आहेत. भूजल क्षेत्रामधील प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्थांची सभासद संख्या १,६४,९८४ इतकी आहे.
(३) केंद्र शासनाच्या पेसा कायद्यातील तरतुदीनुसार ग्राम पंचायती आर्थिक दृष्ट्या व व्यवहारीक दृष्ट्या सक्षम व स्वयंपूर्ण होण्यासाठी तसेच लघु जलाशयांच्या बाबतीत निर्माण झालेल्या महसूलाचा विनियोग संबंधित पंचायत क्षेत्राच्या विकासासाठी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या मासेमारीबाबत अधिनियम १९६० मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे तसेच राज्यातील ज्या तलावाचे मासेमारी हक्क विभागाकडे हस्तांतरीत झाले अशा तलावांचे मासेमारी ठेके दिनांक २६/६/२०१४ नुसार विहित केलेल्या सुधारित तलाव ठेका धोरणानुसार दिले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील आष्टे गावातील आष्टे लॉजेस्टिक कंपनी गुरुचरणाच्या जागेचा अनधिकृतपणे वापरकरीत असल्याबाबत

(४०) ४६६९९ (०४-०३-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील आष्टे गावातील आष्टे लॉजेस्टिक कंपनीने शासनाची गुरुचरणाची जागा स्वतःच्या रस्त्यांसाठी शासनाला न कळविता किवां शासनाबरोबर कोणतेही करार न करता अनधिकृतपणे वापर करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.महसूल मंत्री यांना निदेवद दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत जागेचा वापर करणाऱ्या कंपनीवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :(१) मौजे आष्टे ता. पनवेल येथील ग.नं.८४/१ पे व ग.नं. ८५/१ पे या गुरचरण जमिनीमधून कोन -सावळा हा सार्वजनिक बांधकाम विभागाचा रस्ता गेला असून या रस्त्यापासून ग.नं.८१ मधील मे. आष्टे लॉजिस्टिक्स प्रा.लि. या कंपनीकडे जाणारा वाहिवाटीचा पोहोच रस्ता आहे. लगतच्या ग.नं. ८४/१ पे या गुरुचरण जमिनीमधील काही क्षेत्रातून सदर पोहोच रस्ता जात असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. यासंदर्भात उपअधिक्षक भूमिअभिलेख यांचेकडून मोजणी करुन शहानिशा करण्यात येत आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ३०/१/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, रायगड यांना यासंदर्भात निवेदन दिलेले आहे.

(३), (४) व (५) याप्रकरणी उपअधिक्षक भूमिअभिलेख यांचेकडून मोजणी झाल्यानंतर प्रत्यक्ष वस्तुस्थितीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

पंढरपुर व मंगळवेढा (जि.सोलापुर) या तालुक्यातील माण नदीतून वाळूचा उपसा करुन लिलाव केल्याबाबत

(४१) ४७३२८ (०४-०३-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर व मंगळवेढा (जि.सोलापुर) तालुक्यातील सिमेवरुन वाहणाऱ्या माण नदीतील अनेक पॉईंटचे वाळू लिलाव करावयाचे असल्यास त्या गावाच्या ग्रामपंचातीची वाळू उपसा करण्याबाबत मान्यतेचा ठराव मंजूर करुन घेणे आवश्यक असतांनाही मान्यतेचा ठराव मंजूर करुन न घेता, जिल्हाअधिकारी सोलापूर यांनी मोठया प्रमाणात वाळू उपसा करुन त्या वाळूचा लिलाव केल्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.महसुल मंत्री व पर्यावरण मंत्री यांना लेखी निवेदने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू उपसा करण्यात येत असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल जात असल्याने गावकऱ्यांनी वाळू उपसा करण्याकरीता तीव्र विरोध करण्यात आल्याने पोलीसांनकडून त्यांना मारहाण करण्यात येवून बेकायदेशीर वाळू उपसा सुरुच ठेवण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू उपसा करणाऱ्यांनवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :(१) अशा स्वरुपाची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२), (३) व (४) हे खरे नाही. पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील वाळूगटांचे लिलाव शासन निर्णय १२/०३/२०१३ अन्वये विहित रेती/वाळू धोरणानुसार सर्व संबंधित विभागांच्या परवानग्या घेऊन करण्यात आले आहेत.

तथापि, लोकप्रतिनिधी तसेच गावकऱ्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी सर्व संबंधितांची सुनावणी घेण्यात आली असून, सदर प्रकरणातील सर्व बाबींची तपासणी करुन, उचित निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गारगोटी (जि.कोल्हापूर) येथील केदारल्लीगा देवस्थानची जमीन परत ग्रामपंचायतीला मिळण्याबाबत केलेली मागणी

(४२) ४८६९५ (०४-०३-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगोटी (जि.कोल्हापूर) येथील केदारल्लीगा देवस्थानची जमीन परत ग्रामपंचायतीला मिळावी अशी मागणी निवासी जिल्हाधिकारी यांच्याकडे ग्रामस्थांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिन पश्चिम महाराष्ट्र देवस्थान कमिटीने मागासवर्गीय लोकांना गृहनिर्माण संस्था उभारण्याकरिता दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंग्गाने बेकायदेशीररित्या हस्तांतरण झालेली जमिन पुन्हा देवस्थानकडे परत मिळण्याकरिता कोणती कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :(१), (२), (३) , (४) व (५) मौजे गारगोटी. ता. भूदरगड येथील गट क्र. १०७८ (क्षेत्र ०० हे १४ आर) गट क्र. १०८०(क्षेत्र ०० हे ४२ आर) व गट क्र. १०९१(क्षेत्र हे ०० हे १५ आर) अधिकार अभिलेखात कब्जेदार सदरी केदारलिंग देवस्थान या नावाने होते. सदर देवस्थान जमिनीमध्ये विठ्ठल कोंडीबा कांबळे व इतर हे वाहिवाटदार होते.

ही जमीन ग्रामपंचायतीला मिळावी अशी मागणी ग्रामस्थ, गारगोटी यांनी दिनांक २३/१२/२०१५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे. देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांनी दि. २०/०६/१९९१ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस देऊन उक्त जमिनीची विक्री करण्याच्या दृष्टीने जमिनीच्या किमतीचे देकार मागविले होते. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीने उक्त जमिनीच्या विक्रीसाठी धर्मदाय सहआयुक्त यांच्याकडून परवानगी घेऊन लिलावात सर्वाधिक बोलीनुसार मुख्य प्रवर्तक, नियोजित मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था, गारगोटी यांना दिनांक १५/३/१९९५ रोजी सदर जमिनीची विक्री करुन दिली.

नंतर सदर जमिनीबाबत तहसिलदार, भुदरगड यांनी पाठविलेल्या अहवालास अनुसरुन उपविभागीय अधिकारी, राधानगरी विभाग कोल्हापूर यांनी सुनावणी घेऊन सदर खरेदी व्यवहाराबाबतचा फेर फार रद्द करुन जमीन सरकार हक्कात घेण्याचे आदेश दि. ३१/०३/२०११ रोजी दिले. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन मुख्य प्रवर्तक, नियोजित मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था, गारगोटी यांनी अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे अपिल केले होते. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या दिनांक ७/८/२०१४ रोजीच्या निकालाद्वारे उपविभागीय अधिकारी, राधानगरी यांचे दि. ३१/०३/२०११ चे आदेश रद्द करुन मंडळ अधिकारी गारगोटी यांनी मंजूर केलेला फेरफार कायम केला आहे.

चिमूर (जि.चंद्रपूर) शिवणपायली गावाजवळ ६४ हेक्टर जंगलावरील झाडेझुडप तोडून नागरिकांचे अतिक्रमण होत असल्याबाबत

(४३) ५०२२१ (११-०३-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर पासून (जि.चंद्रपूर) केवळ १८ कि.मी. अंतरावरील शिवणपायली गावाजवळ ६४ हेक्टर जंगलावरील झाडेझुडपे तोडून नागरिकांचे अतिक्रमण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२९-०३-२०१६) :(१), (२), (३) व (४) मौजा शिवणपायली येथील गट क्र. ४४६ व ४४७ अनुक्रमे आराजी ३९.२९ हे.आर व २५.२० हे.आर या शासकीय जमिनीपैकी अंदाजे १२.८० हे.आर जमिनीवर १३ व्यक्तींनी अतिक्रमण केल्याचे आढळून आले असता सदर १३ व्यक्तींविरुद्ध पोलीस स्टेशन चिमूर येथे दि. ०२.०१.२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

तद्नंतर अतिक्रमण करणा-या एका व्यक्तीविरुद्ध तहसिलदार, चिमूर यांनी दि.०७.०७.२०१५ च्या आदेशान्वये दंडात्मक कार्यवाही करुन अतिक्रमण निष्कासित केले आहे.

सद्यःस्थितीत सदर शासकीय जमिनीवर कोणाचेही अतिक्रमण झाल्याचे आढळून आलेले नाही.

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील महावितरणच्या ग्राहकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी असल्याबाबत

(४४) ५०५८१ (०४-०३-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील महावितरणच्या ४१ हजार ६५२ वीज ग्राहकांकडे ६ कोटी ८९ लाख ६८०० ची थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकबाकीमध्ये वेंगुर्ला तालुक्यात ४ हजार १११ ग्राहकांमध्ये ६८ लाख १० हजार, तर कुडाळमध्ये ६,३१८ ग्राहकांकडे १ कोटी ३७ लाख, सावंतवाडीतील ६ हजार २८८ ग्राहकांकडे ९६ लाख ९२ हजार रु दोडामार्ग ओरोस देवगड कणकवली, मालवण, वैभववाडी आदि तालुक्यातील ग्राहकांकडे थकबाकी असल्याचे निदर्शनास
आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने असलेली वीज बिलाची थक बाकि वसुल करण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीकडून चौकशी करण्यात आली आहे.

(४) विभागीय व मंडळ स्तरावर थकबाकीदार ग्राहकांकडून थकबाकी वसुलीकरीता अधिकारी/कर्मचारी यांची पथके शाखा कार्यालयापर्यंत जावून वसुलीची मोहिम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. थकबाकी वसुलीकरीता ग्राहकांना आपले बिल भरण्यासाठी जाहीर निवेदन (टॉम टॉमींग) सुरु आहे. सुट्टीच्या दिवशी कॅश कलेक्शन सेंटर्स सुरु ठेवण्यात येत आहेत. तसेच वसुली मोहिम पथकाकडून केलेल्या कार्यवाहीचा आढावा मंडळ निरीक्षकाद्वारे दरदिवशी घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर येथील नगर क्लबने ५६ लाखांचा करमणुक कर बुडविल्याबाबत

(४५) ५१७९५ (०४-०३-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील नगर क्लबच्या संचालकांनी नववर्षाचे स्वागत करण्याच्या उदेशाने ३१ डिसेंबर, २०१५ रोजी काही मनोरंजनाचे कार्यक्रमाचे आयोजन नगर क्लबमध्ये करण्यात आले असता त्याकरीता प्रवेश फिच्या नावानी प्रत्येक सभासदाकडून एक हजार रूपये जमा करण्यात आले होते,

(२) असल्यास, मागील वर्षी सुध्दा अशाच प्रकारचे आयोजन करून लाखो रूपये जमा करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन्ही कार्यकमाचे करमणुक कर शासनास जमा करण्यात आले नसल्यामूळे जिल्हा करमणुक शाखेने दोन्ही वर्षाचे ५ लाख ८० हजार रुपये कर बुडविल्यामूळे त्यावरील १० पट दंड याप्रमाणे ५६ लाख रूपये तातडीने भरावे अशा प्रकारची नोटीस देण्यात आली असल्याचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर वसुल करण्याबाबबत तसेच कर कर बुडविणाऱ्या नगर क्लबच्या संचालकांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकारीऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :(१), (२), (३), (४) व (५) अहमदनगर येथील अहमदनगर क्लबने सन २०१४ व सन २०१५ मध्ये सभासदांच्या देयकामध्ये क्लबसाठी आकारत असलेल्या एकूण रकमेपैकी अनुक्रमे रु.८००/-व रु.१०००/- इतकी रक्कम "क्लब डे सिलेब्रेशन" साठी आकारली असल्याचे आढळुन आले आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींन्वये करमणूक शुल्क व त्यावरील दंडापोटी अनुज्ञेय होणारी रु.५८,०३,१६०/- इतकी रक्कम शासनास जमा करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्या दि.०६.०२.२०१६ च्या नोटीसीन्वये अहमदनगर क्लबला आदेशित करण्यात आले असून सदर प्रकणामध्ये अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत विहीत नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यात जुन्या तारखांच्या स्टॅम्प पेपरची दाम दुप्पट किमतीला विक्रि केल्याबाबत

(४६) ५२३२६ (०४-०३-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात मालमत्तेचे ८ ते १० वर्षापूर्वीचे जुने व्यवहार केलेले दाखविण्यासाठी जुन्या तारखांच्या स्टॅम्प पेपरची बाजारात मागणी असल्याने त्याचा फायदा घेत एका भामट्याने चहाच्या पाण्यात स्टॅम्प पेपर बुडवून स्टॅम्प पेपरवर जुनाट व पिवळेपण आणून बाजारात दामदुप्पट किंमतीला विक्री करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या भामट्याने स्टॅम्प पेपर कोणाकडून घेतले व कोणाकडे विक्री केली याची पोलीसानकडून चौकशी करुन काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :(१) होय. हे खरे आहे.
(२) होय.
(३) प्राप्त अहवालानुसार, आरोपी अशोक अरुण खरात यांना पोलीसांनी अटक केली असून सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. आरोपी कडे पोलीसांनी विचारपूस केली असता, त्याने स्टॅम्पपेपर्स कोणाला विक्री केले, याबाबत काहीही एक आठवत नाही व माहिती नाही, असे सांगितल्याने त्याचेकडून कोणत्या ग्राहकाने मुद्रांक खरेदी केली त्यांची नावे अद्याप पावेतो निष्पन्न झालेली नाहीत. सदर गुन्हयाचा तपास पोलीस यंत्रणेमार्फत चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील दुयम निंबधक कार्यालयाकडून पाठवलेले मुळ दस्तऐवज तलाठी कार्यालयातून गहाळ झाल्याबाबत

(४७) ५२४२४ (१७-०३-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील दुयम निंबधक कार्यालयाकडून पाठवलेले मुळ दस्तऐवज पक्षकारांना मिळण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून गाववार यादी करुन तलाठी कार्यालयात पाठविण्यात येतात, परंतु तलाठी कार्यालयातून अपेक्षेप्रमाणे कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे यापूर्वी नोंदणी कार्यालयाने तलाठ्यामार्फत देण्यासाठी दिलेले दस्तऐवज धूळ खात पडून असून काही दस्तऐवज हरवल्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कागदपत्रे गहाळ करणाऱ्या तलाठी कार्यायातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (३०-०३-२०१६) :(१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्हयातील १२ तालुक्यांपैकी करवीर तालुका वगळता ११ तालुक्यांमध्ये दुय्यम निबंधक यांचेकडून मुळ दस्तऐवज गावदप्तरी यादी करुन तलाठी कार्यालयात पाठविण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही केली जात आहे. सदर तालुक्यांत या संदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. करवीर तालुक्यात तलाठी कार्यालयाकडे दुय्यम निबंधक कार्यालयाकडून वाटप करणेसाठी प्राप्त झालेले दस्तऐवज पक्षकारांना तलाठी यांचे मार्फत वाटप करणेत आलेले आहेत. परंतू सन १९९२ व १९९५ या कालावधीमधील मौजे पाडळी खुर्द, ता. करवीर या गावातील एकूण १२३ खरेदी, विक्रीच्या दस्तांची यादी सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, करवीर क्र.२, कोल्हापूर यांच्याकडून दिनांक २५/०१/२००६ रोजी संबंधित तलाठी यांचे नांवे देणेत आली होती. यादीतील पाडळी खुर्द येथे कायमस्वरुपी वास्तव्यास असलेले एकूण २५ मूळ दस्त संबंधित जमीनधारकांना पोच घेऊन देणेत आलेले आहेत. तथापि, गावी वास्तव्यास राहत नसलेले खातेदार व सदरचे खरेदी

घेणारे खातेदार शहराच्या विविध भागात वास्तव्यास असलेने व त्यांचे पत्ते आढळून येत नसलेने ९७ दस्त तहसिलदार कार्यालयामार्फत सह दुय्यम निबंधक कार्यालयाकडे परत केले आहेत. उर्वरित एक दस्त मिळाला नसल्याबाबतची तक्रार मौजे पाडळी खुर्द, ता. करवीर या सजामध्ये प्राप्त झाली होती.

ज्या पक्षकारांचा दस्त हरविलेला होता, त्या पक्षकारास दुय्यम निबंधक कार्यालयाकडून दस्ताची दुय्यम प्रत प्राप्त करुन देण्यात आलेली आहे. तसेच संबंधित तलाठयाला याबाबत नोटीस काढून त्यांचे म्हणणे घेणेत आले होते. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, करवीर कार्यालयामार्फत चौकशीची कार्यवाही सुरु असतांना संबंधित तलाठी हे सापळा प्रकरणामध्ये सापडल्याने त्यांना उपविभागीय अधिकारी, करवीर कार्यालयाच्या दिनांक ११/०६/२०१५ रोजीच्या आदेशान्वये बडतर्फ केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

निळवंडे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील ग्रामपंचायत मिळकत नं. २७१ वर अतिक्रमण झाल्याबाबत

(४८) ५२६२९ (११-०३-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील गट नं.३ पैकी ०.०५ आर (५ गुंठे) ग्रामपंचायत मिळकत नं.२७१ या जमिनीवर गावातील आहेर कुटुंबियांनी बेकायदेशीर अतिक्रमण केल्याची तक्रर महेशगिरी महाराज आश्रमाचे श्री.मच्छिंद्र काळे यांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांचेकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर अतिक्रमण करणाऱ्यांवर व केलेले अतिक्रमण काडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२९-०३-२०१६) :(१), (२) व (३) तक्रारदार श्री. मच्छिंद्र काळे यांनी दि. ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे तक्रार केली होती. त्याअनुषंगाने प्रश्नाधीन जागेवरील सर्व अतिक्रमणधारकांना जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी नोटीसा बजावल्या असून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतूदींनुसार अतिक्रमणे निष्कासनाची कार्यवाही जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे स्तरावरुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भद्रावती तालुक्यातील नंदोरी (खु), (जि.चंद्रपूर) परिसरात अवैधरित्या दगड उत्खनन केल्याबाबत

(४९) ५२६४१ (०४-०३-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदोरी (खु), (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) परिसरात दगड उत्खनन करण्याकरिता चंद्रकांत वासाडे यांनी दोन वर्षापूर्वी सर्व्हे नं.२० ची परवानगी घेऊन सर्व्हे नं. १७ व १८ मधून अवैधरित्या उत्खनन केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन कारणाऱ्यांवर शासनाने गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :(१) होय.

(२) व (३) चंद्रपूर जिल्हयातील गौण खनिजाच्या खाणपट्टयांची इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन मशीनच्या सहाय्याने मोजणी करण्यात आली. त्यामध्ये मौजा चोपणरिठ, ता. भद्रावती येथील सर्व्हे नं. २० मधील खाणपट्टयाची व त्यालगतच्या सर्व्हे नं. १७, १८, १९ व ५३ मधील उत्खननाचीही मोजणी केली असता, सर्व्हे नं. १७, १८, १९ व ५३ मध्ये गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन केल्याचे, तसेच सर्वे नंबर २० मध्ये मंजूर केलेल्या खाणपट्टयामधून संबंधित खाणपट्टाधारकाने जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेल्या हिशेबापेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सर्व्हे नं. १७ व १९ मधील विनापरवानगी उतखननापोटी दंडात्मक कारवाई करून, संबंधित जमीनमालकांविरूध्द दिनांक २९/०२/२०१६ रोजी रुपये ४८,२१,२४,१८३/- इतक्या रकमेचे दंडाचे आदेश पारित करण्यात आले आहेत. तसेच सर्व्हे नं. २०, १८ व ५३ मधील गौण खनिज उत्खननाबाबतच्या पडताळणीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्यातील खाजगी, आदिवासी व वन विभागाच्या टेकड्या भुईसपाट करुन लक्षावधी ब्रास माती बांधकाम आणि भरावासाठी बिनधास्त पणे चोरी होत असल्याबाबत

(५०) ५२९०९ (११-०३-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण, अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) येथील ग्रामीण भागातील शासकीय, खाजगी, आदिवासी व वन विभागाच्या असलेल्या टेकड्या भुईसपाट करुन लक्षावधी ब्रास मातीची बांधकाम आणि भरावासाठी चोरी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमाफीयांनी मातीचा भराव टाकून अवैध चाळी आणि इमारती उभारल्या असल्याबाबत येथील स्थानिक नागरीकांनी संबंधित पोलिसठाणे तसेच जिल्हाधिकारी यांचेकडे वारंवार तक्रारी करुनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीतच्या अनुषंगाने भूमाफियांविरुध्द केलेल्या तक्रारीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (३०-०३-२०१६) :(१), (२), (३) व (४) या संदर्भात स्थानिक नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या असून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून अहवालही प्राप्त झाले आहेत. प्राप्त तक्रारी व अहवालांची शहानिशा करुन, तहसिलदार कल्याण व तहसिलदार अंबरनाथ यांनी मातीच्या अवैध भरावाबाबत संबंधितांविरूध्द दंडात्मक कारवाई केली आहे. तसेच फौजदारी गुन्हेही दाखल केले आहेत.

तसेच तहसिलदार कल्याण यांनी विनापरवानगी उभारण्यात आलेली १७४१ बांधकामे निष्कासीत केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.